## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

सदाशिव जे रावकवी यांच्या 'चित्रसहकार' या निर्मिती संस्थेसाठी य.गो.जोशी यांच्या कथेवरील या चित्राने पंचवीस चित्रपटगृहात प्रत्येकी पंचवीस आठवडे चालण्याचा विक्रम केला. त्याच बरोबर संपूर्ण चित्र फक्त पस्तीस दिवसात मुहूर्तापासून सेन्सॉरपर्यंत पूर्ण करण्याचाही विक्रम आठवले यांनी केला. चित्रीकरणाचे अभ्यासपूर्ण संयोजन आणि तंत्रावरील प्रभुत्व या आठवले यांच्या गुणांमुळेच ते शक्य झाले.

मातृसुखाला पारखा झालेला दीर आणि पुत्रखापासून वंचित राहिलेली वहिनी यांच्या निर्मळ प्रेमाची अत्यंत जिव्हाळ्याने चित्रित केलेली कौटुंबिक कलाकृती. या चित्रपटाने सुलोचना या अभिनेत्रीला ग्रामीण चित्रपटातून घरात, माजघरात, अगदी स्वयंपाकघरात आणले. सोज्वळता म्हणजे सुलोचना या समीकरणाची सुरवात या चित्राने झाली. दिग्दर्शन आणि गीतलेखन याखेरीज आठवल्यांनी या चित्रात सुलोचना यांच्या पतीची भूमिकाही केली होती. हे चित्र एका वेगळ्या अर्थानेही कौटुंबिक होते – यात आठवले यांचे संपूर्ण कुटुंब पडद्यावर दिसले होते. मुलगा सुदर्शन छोट्या भावाचा शाळेतील मित्र झाला होता. सुमतीबाई, मुली आणि एक मेव्हणी यांनी हळदीकुंकवाच्या प्रसंगात भाग घेतला होता. दादा म्हणजे आठवले आणि वहिनी म्हणजे सुलोचना यांच्या पडद्यावरील लग्नप्रसंगी सुमतीबाई नवऱ्याच्या लग्नाला नवऱ्यामुलीच्या मागे करवली म्हणून हजर राहिल्या होत्या.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### तू नसतीस तर

तू नसतीस तर रोप चिमुकले
गेले असते सुकून वाकुन
तू नसतीस तर केले असते
कुणी तयावर अमृत सिंचन?
तू नसतीस तर.

तू नसतीस तर मिळता कोठून
घरट्याचा हा रम्य निवारा
तू नसतीस तर मिळता कोठून
पंखाखाली गोड उबारा?
तू नसतीस तर.

तू नसतीस तर कळली नसती
कळ्या फुलांची कोमल बोली
तू नसतीस तर मिळली नसती
मृदु शीतलता चांदण्यातली
तू नसतीस तर.

तू नसतीस तर कळले नसते
जीवन म्हणजे अथांग प्रीती
तू नसतीस तर जुळल्या नसत्या
गीताच्या या मंजुळ पंक्ती
तू नसतीस तर.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### सापडले रे सापडले

सापडले रे सापडले
ते सापडले रे सापडले
ते सापडले.

रात्रंदिन जे धुंडित होतो
अजुनी होते जे दडले
रे सापडले ते सापडले.

केले होते वेडे ज्यांनी
कोडे अवघड उलगडले
कोडे अवघड उलगडले
हपापलेल्या हृदयावरती
अमृत कुणीतरी शिंपडले
रे सापडले ते सापडले.

नयनी भरले हृदयी शिरले
शब्दांच्या जे पलीकडले
शब्दांच्या जे पलीकडले
देवाहुनीही थोर मनोहर
दर्शन त्याचे मज घडले
रे सापडले ते सापडले.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### भाग्यवती मी भाग्यवती

भाग्यवती मी भाग्यवती
गं भाग्यवती मी भाग्यवती.

देवदयेने मला लाभली
जगावेगळी श्रीमंती
गं भाग्यवती मी भाग्यवती.

आनंदाचे निळे सरोवर
तसे सुखाने भरलेले घर
प्रीती शांतीची हसरी कमळे
सदा तयावर तरंगती
गं भाग्यवती मी भाग्यवती.

चंद्र नभीचा खाली आला, खाली आला
तिलक कपाळी माझ्या झाला
मीच माझिया सौभाग्याची
महती सांगू किती किती
गं भाग्यवती मी भाग्यवती.

दु:ख माझिया दारी येते
थबकुनी दबकुनी उभे राहते
गंध सुखाचा पिउनी त्याचे
विचार सारे विरघळती
गं भाग्यवती मी भाग्यवती.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### दो नयनांचे हितगुज झाले

दो नयनांचे हितगुज झाले
तुला समजले मला उमजले

क्षणभर गेले तेज लकाकुन
अंतरातला कण कण उजळून
गात्रा गात्रातुनी निथळले
तुला समजले मला उमजले.

स्वप्नांनी आकार घेतला
मौनातुन हुंकार उमटला
शब्दाना माधुर्य गवसले
तुला समजले मला उमजले.

दोन मनांचे झाले मीलन
खुले जीवनी नवीन दालन
त्यात चांदणे धुंद पहुडले
तुला समजले मला उमजले.

अंतर्यामी येत कोरिता
मरणाला जे न ये चोरिता
काहीतरी जे जगावेगळे
तुला समजले मला उमजले.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### देवा तुझी आठवण होते

देवा तुझी आठवण होते
सुख मावळते आणि शिरावर
संकट कोसळते
देवा तुझी आठवण होते.

सुंदर सुमने मुकती प्राणा
उरात घुसती काटे
आग धगधगे वरती खाली
वाळवंट रखरखते
देवा तुझी आठवण होते.

दुबळ्या जीवा कळे न जेव्हां
काय खरे अन् खोटे
पिचते अंतर अन् रक्ताचे
पाणी पाणी होते
केवळ ढळढळ अश्रू ढाळणे
हेच नशिबी येते
देवा तुझी आठवण होते.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### रडू नको रे चिमण्या बाळा, चिमण्या बाळा

रडू नको रे चिमण्या बाळा, चिमण्या बाळा
हसण्यासाठी जन्म आपुला.

फुले गोजिरी कधी न रडती, कधी न रडती
नभी पाखरे हासत उडती, हासत उडती
पहा विचारूनि आभाळाला, आभाळाला
हसण्यासाठी जन्म आपुला.

निळ्या अंगणी हसती तारे
हासत रिंगण धरती वारे
सदैव हसतो चंद्र चिमुकला, चंद्र चिमुकला
हसण्यासाठी जन्म आपुला.

सौख्यासाठी जग तळमळते
दु:ख कुणाला कधी न टळते
जो हसला तो अमृत प्याला, अमृत प्याला
हसण्यासाठी जन्म आपुला.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

**प्राजक्ताच्या पायघड्या**

**(ओव्या)**

प्राजक्ताच्या पायघड्या हळू हातांनी पसरा
जाई जुईच्या कळ्यांची वर अब्दागीर धरा
वर अब्दागीर धरा.

अमृताचे सरोवर, कुबेराचे गं भांडार
तुझ्या रूपे आला घरी इवलासा विश्वंभर.

पाखरांची किलबिल वाजे सनई देवाची
सोनकळी उमलली झोप झाली राघवाची.

अंगणीच्या सोनचाफ्या करू नको उगा तोरा
पहा माझ्या सोनुल्याचा रंग कसा गोरा गोरा.

तीट काजळ करिते करू नको दांडगाई
लक्ष नक्षत्रांची दृष्टी बाळा तुझ्यावर जाई.

सदा उघडे नागडे निळे आभाळ सुंदर
तसा खेळतो गोविंद वस्त्र नको अंगावर.

रानीच्या रे गार वाऱ्या नको आणूस झुळुका
करू देई रे अंगाई माझ्या शिणल्या बालका.

माझ्या की गं ओसरीला आले आकाश पाहुणे
म्हणे पाहू दे गं डोळा तुझे नक्षत्र देखणे
वद्य पक्षीचा चंद्रमा माझ्या की गं दारी उभा
पहा मागतो उसनी सोनुल्याची मुखप्रभा.

## चित्रपट - वहिनींच्या बांगडया

### गृहस्थाच्या अंगणात (ओव्या)

गृहस्थाच्या अंगणात हवे तुळशीचे रोप
पाय ठेविता पापाचा तिथे होई थरकाप

तुळशी गं माझे आई तूच आमुची पुण्याई
पूजा तुझी केल्याविण अन्न मुखी घालु नाही

तुळशीच्या आसपास कोटी देवतांचा वास
वारंवार नमस्कार, माझा तुळशी मातेस.